आधुनिक विचारांचे
# वर्तमान
बीड । मंगळवार, ४ जानेवारी २०२२ । वर्ष : ४ — आपले वृत्तपत्र, आपला आवाज — अंक : ९ । पाने : ४ । मूल्य २ ₹



भारतीय स्त्रियांना शिक्षणाचे दरवाजे खुले करून देणाऱ्या, भारतीय शिक्षणाच्या जननी, क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

: संपादक

# मेरे आंगने में तुम्हारा क्या काम है?



### बारा भोकशाचा पाना

माजलगाव मतदारसंघाचे माजी आमदार आर.टी.देशमुख ऊर्फ जिजा यांनी आपल्या आमदारकीच्या काळात जनतेशी थेट संवाद साधणारा लोकप्रतिनिधी म्हणून चांगले काम केलेले आहे. मध्यंतरी दीर्घकाळ आजारी असल्याने त्यांचा माजलगाव मतदारसंघाशी संपर्क तुटला होता. मात्र गेल्या काही महिन्यांपासून आजारातून ठणठणीत झाल्यानंतर जिजांनी माजलगाव मतदारसंघाशी अधिक संपर्क वाढवल्याने राजकीय धुरिणांच्या भुवया उंचावणे साहजिक आहे. जिजांच्या सक्रियतेमुळे हनुमान कदम यांच्यासारख्या जिजांवर शत-प्रतिशत विश्वास टाकून काम करणाऱ्या अनेक समर्थकांच्या मनात आनंदाचे भरते येणे साहजिक आहे. दुसरीकडे जिजांच्या विरोधकांच्या पोटात गोळा उठला असे म्हटले तर अतिशयोक्ती ठरणार नाही. जिजांच्या सक्रिय राजकारण संकेतामुळे आगामी विधानसभा निवडणूक उत्सुकावर्धक ठरण्याची चिन्हे दिसत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतही जिजांच्या वाढलेल्या संपर्कामुळे भाजपला मोठा फायदा होईल, असा दावा जिजांचे समर्थक करत आहेत. थेट बांधावरच्या माणसाच्या खांद्यावर हात टाकून दिलखुलासपणे बोलणारे जिजा अफलातून व्यक्तिमत्त्व आहे. दुर्धर आजारावर मात करून सक्रिय झालेल्या जिजांचे वेलकमचे केले पाहिजे. ऐन दिवाळीत जिजांनी समर्थकांच्या गाठी-भेटी घेवून माजलगावकरांचे ऋण कदापीही विसरणे शक्य नाही. अशी प्रांजळ कबुली दिली. दिवाळी भेटी-गाठी नंतर ओबीसी आरक्षणासंदर्भात नित्रुड येथे झालेल्या रास्ता रोको आंदोलनाचे नेतृत्व त्यांनी केले. एकंदरीत आर.टी.देशमुख यांनी माजलगाव मतदारसंघात संपर्क वाढवल्याने त्यांचे भाजपातील विरोधक मेरे आंगने में तुम्हारा क्या काम है? अशी खोचक टिका करताना दिसत आहे.

**दाजी**

(महाराष्ट्रातील नामांकित लेखक या सदरातून दर आठवड्याला भाष्य करणार आहेत.)

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क
9423209823
मुख्यालय : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड

# जनतेने गांभीर्य ओळखावे

## तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर आरोग्यमंत्र्यांचे वक्तव्य

प्रतिनिधी

जालना : जनतेने अनावश्यक गर्दी करू, मास्कचा वापर करावा. तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर कोरोना नियमांचे पालन करावे, असे सूचक वक्तव्य राज्याचे आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी जालना येथे केले.

देशात लसीकरणात आता नव्या टप्प्याला सुरूवात झाली आहे. एका बाजूला कोरोना रूग्णांची संख्या वाढत असताना देशात १५ ते १८ वयोगटातील मुलांना लसीकरण सुरू करण्यात आले आहे. यानिमित्त राज्याचे आरोग्य मंत्री राजेश टोपे हे सोमवारी जालन्यात पोहोचले. त्यांनी एका लसीकरण केंद्रावर ते पोहोचले. जालन्याचे पालकमंत्री असणाऱ्या राजेश टोपे यांनी लसीकरणाचा आढावा घेतला. यानंतर बोलताना त्यांनी सांगितलं की, मुले उत्साहाने लसीकरणासाठी आली आहेत. त्यांची नोंदणी करण्यात आली आहे. त्यांना कोव्हॅक्सिन लस देण्यात येत आहे. केंद्र सरकारने दिलेल्या नियमांनुसार ही प्रकिया राबवली जात असून स्वतंत्र व्यवस्थाही उभारली आहे. कोरोना चाचणीचे किट उपलब्ध करून देण्याची मागणी केंद्राकडे करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय विमानतळांवर तपासणी करण्याबाबत मार्गदर्शन करण्याची मागणी केंद्राकडे राज्य सरकारने केली असल्याचेही राजेश टोपे म्हणाले. लॉकडाऊनसंदर्भात विचारले असता राजेश टोपे म्हणाले की, वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळ्या पद्धतीने निर्बंध लागू केले जातायत. महाराष्ट्रात उपलब्ध ऑक्सिजन आणि रुग्णालयातील बेड्सची संख्या यावरून निर्बंध ठरवण्यात येतील. सध्या हरियाणात, दिल्लीत निर्बंध आहेत. प्रत्येक राज्य वेगळ्या पद्धतीने निर्बंध लागू करतायत. तर आयसीएमआर वगैरे संस्था आहेत त्यांना नियोजनाचे अनुभव असतात, त्यांनी सर्व राज्यांना समान निर्बंध लागू करण्याबाबत मार्गदर्शन करायला हवं अशी मागणी केंद्र सरकारकडे केली असल्याचेही राजेश टोपे यांनी सांगितले.



राज्यातील अनेक नेत्यांना कोरोनाची लागण झाली आहे. त्यावरून विचारलेल्या प्रश्नावर बोलताना राजेश टोपे म्हणाले की, राज्यात निर्बंध इतके सक्तीने केले आहेत तर सर्वानीच काळजी घ्यायला हवी. नेत्यांना कोणत्याही कार्यक्रमाला बोलावल्यावर किती गर्दी असते हे माहिती नसते, आयोजक गर्दी करतात. नेत्यांनी आयोजकांना सूचना द्याव्यात. आयोजकांनी गर्दी होणार नाही काळजी घ्यावी. जनतेनेसुद्धा अशा गोष्टींचें भान ठेवावे.

## फास्टट्रॅकन्यूज





### पालकमंत्री धनंजय मुंडेंकडून पंकजा मुंडेंना मेसेज

बीड : भाजपच्या राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांना दुसऱ्यांदा कोरोनाची लागण झाल्यानंतर सामाजिक न्याय मंत्री तथा बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी पंकजा मुंडे यांना मेसेज करत काळजी घेण्याची सूचना केली आहे. मी पंकजाताईला फोन तर करू शकलो नाही. मात्र, मॅसेजद्वारे सांगितले की पोस्ट कोविड होण्याची दाट शक्यता असल्याचे तब्येतीची काळजी घेण्याची गरज असल्याचे धनंजय मुंडे यांनी बहीण पंकजा मुंडे यांना सांगितले. ते बीडमध्ये माध्यमाशी बोलत होते. बीड जिल्ह्याच्या जनतेला आवाहन केले आहे की, अद्याप कोरोना संपलेला नाही नागरिकांनी आवश्यक जरूरी असेल तरच घराच्या बाहेर पडावे अन्यथा घरातच राहावे. गर्दीच्या ठिकाणी जाणे शक्यतो टाळावे, मास्क व सॅनिटायझरचा वापर करावा, असे आवाहन बीड जिल्हावासीयांना केले.

### मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळावर जयसिंह सोळंके



औरंगाबाद : जिल्हा परिषद बीडचे सभापती जयसिंह सोळंके यांची मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्यकारिणी मंडळ सदस्यपदी निवड करण्यात आली आहे. याबाबतचे नियुक्तीपत्र मंडळाचे सरचिटणीस तथा आमदार सतिष चव्हाण यांनी दिले आहे. मराठवाड्यात शैक्षणिक क्षेत्रात प्रगतीपथावर असलेल्या मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्यकारी सदस्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल जयसिंह सोळंके यांचे अभिनंदन मंडळाचे अध्यक्ष प्रकाश सोळंके, सरचिटणीस सतिष चव्हाण, प्रशासकीय अधिकारी एफ.जी.माळी यांच्यासह विविध स्तरातील मान्यवरांनी केले आहे.

### भारतात कोरोनाची तिसरी लाट धडकली टास्क फोर्स

नवी दिल्ली : भारतात अखेर कोरोना संसर्गाची तिसरी लाट धडकली आहे. देशाचे कोविड टास्क फोर्स प्रमुख डॉ.एन.के.अरोरा यांनी याबाबत अत्यंत महत्त्वाची माहिती दिली आहे.

वर्तमान प्रतिबिंब
रहा ऑनलाईन कनेक्ट..
www.vartmannews.in
या वेबसाईटला भेट द्या !

### मृदुंगाचार्यांच्या घरी पालकमंत्री



अंबाजोगाई : जागतिक कीर्तीचे पखवाज वादक पंडित उध्दवबापू आपेगावकर यांच्या मृदुंग या निवासस्थानी सोमवारी राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा बीडचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी आपेगावकर कुटुंबियांसमवेत संवाद साधला.

### क्रेडीट कार्डवरुन सव्वा लाखाची ऑनलाईन फसवणूक

प्रतिनिधी

अंबाजोगाई : अज्ञात व्यक्तीने एकाचे क्रेडिट कार्ड वापरून एकदा १ लाख ३० हजार तर दुसऱ्या वेळेस २ हजार ९९९ रूपयांची खरेदी करून एकाची फसवणूक केल्याप्रकरणी अंबाजोगाई शहर पोलिसात भामट्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. चांगदेव संदीपान मुंडे (रा.पोखरी रोड, ता.अंबाजोगाई) या शेतकऱ्याचे अज्ञात व्यक्तीने दि. २२ नोव्हेंबर रोजी क्रेडिट कार्डमधून एकदा १ लाख ३० हजाराची तर दुसऱ्या वेळेस २ हजार ९९ रुपयांची खरेदी करून एकूण १ लाख ३२ हजार ९९९ रुपयांची खरेदी करुन फसवणूक केली.

## आठवडी बाजाराचा प्रलंबित प्रश्न मार्गी

### नगराध्यक्ष शेख मंजूर यांच्या प्रयत्नांना यश

प्रतिनिधी



माजलगाव : अनेक वर्ष प्रलंबित राहिलेला माजलगाव आठवडी बाजाराचा प्रश्न मार्गी लागल्याने नागरिक समाधान व्यक्त करत आहेत. दरम्यान, नगराध्यक्ष शेख मंजूर यांच्या प्रयत्नामुळे हा प्रश्न पूर्णत्वास जात आहे.

गेल्या अनेक वर्षापासून शहरवासियांच्या अत्यंत गरजेचा असणारा आठवडी बाजाराचा प्रश्न मार्गी लागला आहे. नगराध्यक्ष म्हणून वर्षभर केलेल्या शहरातील अनेक विकास कामात सोबत आठवडी बाजाराचा प्रश्न सोमवारी या स्थळाचे भूमिपूजन होऊन मार्गी लागत आहे. हे माझ्या कार्यकाळातील मोठे समाधान आहे, असे प्रतिपादन नगराध्यक्ष शेख मंजूर यांनी व्यक्त केले. रविवारी सकाळी ११ वाजता शहरातील सर्वे नंबर ३७२ मधील नगरपरिषदेच्या साडेतीन एक्कर जागेत आमदार प्रकाश सोळंके यांच्या हस्ते बाजार स्थळाचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी विशाल भोसले, नगरसेवक विजय साळवे, सुशांत पौळ, इम्रान पटेल न.प. पदाधिकाऱ्यांसह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. याप्रसंगी नगराध्यक्ष शेख मंजूर यांनी वर्षभरातील कार्यकाळात केलेल्या कामाचे सुतोवाचन केले. या दरम्यान ते म्हणाले की,





शहरातील आठवडी बाजार नागरिकांसह, परिसरातील शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न होता. यासाठी अनेक आंदोलने झाली आहेत. भाजीपाला विक्रीत्यांसह ग्रहणी माताभगिनींची परवड होताना रेंगाळलेल्या बाजार प्रश्नामुळे अनुभवली आहे. सोमवारी बाजारस्थळाचे भूमिपूजन आमचे नेते आमदार प्रकाश सोळंके यांच्या हस्ते करून तो प्रश्न मार्गी लागत आहे, हे माझे मोठे समाधान आहे. नगरपालिकेच्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून या ठिकाणी एक कोटी रुपये निधी खर्च करून पायाभूत सुविधा लवकरच उभारण्यात येणार असल्याचे ते यावेळी म्हणाले.

# चाटगावकरांचा अंत पाहू नका!

## रस्त्याप्रश्नी ग्रामस्थ पुन्हा आक्रमक ; तीन वर्षांपूर्वी काम मंजूर होऊनही मार्गी लागेना

प्रतिनिधी

धारूर : केवळ आश्वासने देऊन चाटगाव रस्त्याप्रश्नी प्रशासन चाटगावकरांची दिशाभूल करत आहे. चाटगावकरांचा अंत पाहू नका? असा आक्रमक पवित्रा ग्रामस्थांनी घेतला आहे. दरम्यान, याप्रश्नी उपोषण करणार असल्याचा इशारा भाजप नेते तथा चाटगावचे उपसरपंच बालासाहेब केकान यांनी निवेदनाद्वारे दिला आहे. तर रविवारी सामाजिक कार्यकर्ते गोविंद महादेव केकान यांच्या नेतृत्वाखाली रस्ता रोको आंदोलन करण्यात आले.





**बीड येथे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या अभियंत्यांना उपोषणाचे निवेदन देताना बालासाहेब केकान. तर दुसऱ्या छायात्रित बीड-परळी महामार्गावर गोविंद केकान यांच्या नेतृत्वाखाली रास्ता रोको करण्यात आला.**

स्वतःच्या गावाचा रस्ता डांबरीकरण व्हावा याकरिता धारूर तालुक्यातील चाटगाव ग्रामस्थांनी रविवारी रास्ता रोको केला. सामाजिक कार्यकर्ते गोविंद केकान यांनी या रास्ता रोको चे नेतृत्व केले. बीड परळी महामार्ग ते चाटगाव हे चार किमीचे अंतर आहे. मात्र या रस्त्यावरून जाताना वाहनधारकांची तारांबळ उडत रस्त्यात खड्डे की खड्ड्यात रस्ता अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.. सन २०१८-१९ या वर्षात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत चार किमी रस्त्याला मंजुरी मिळाली.

मात्र अद्याप रस्त्याचे काम करण्यात आले नसल्यामुळे चाटगाव ग्रामस्थांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. सन २०१८-१९ या वर्षात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत चार किमी रस्त्याला मंजुरी मिळाली. मात्र अद्याप रस्त्याचे काम करण्यात आले नसल्यामुळे चाटगाव ग्रामस्थांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. र

विवारी सकाळी बीड-परळी महामार्गावरील चाटगाव फाट्यावर गोविंद केकान रास्ता रोको केला . चाटगावचा रस्ता नाही झाला तर लवकरच ग्रामस्थांसह गोविंद केकान यांनी बीड येथे जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयासमोर धरणे आंदोलन करत उपोषणास बसणार असल्याचे सांगितले.

## संपादकीय

### नववर्षाचे स्वागत करताना...

कोरोनाच्या सावटाखाली आपण सर्वांनी नववर्षाचे स्वागत केले आहे. नव्या वर्षाचे स्वागत करताना आपण गत वर्षाचा आढावा घेतो, त्यावेळी जाणवते आज मी तेच काम वेगळ्या पद्धतीने, वेगळ्या प्रकारे केले असते. वयाप्रमाणे ज्ञानात, अनुभवात, विचारात फरक पडतो. भूतकाळाकडून झालेल्या चुका सुधारा, पण भूतकाळात अडकून बसल्यास, चिकटून राहिल्यास, प्रगती खुंटेल. तसेच आपण येत्या वर्षात काय करायचे याची आखणी आखा; परंतु त्या भविष्याच्या दिवास्वप्नात फक्त रममाण झाल्यास हाती असलेला वर्तमानकाळ निघून जाईल. तेव्हा युवकांनो, जगा वर्तमानकाळात. वर्तमानात जगणाऱ्यांकडे यश चालून येते. म्हणून पंडितांनी वर्तमान क्षणाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. या नववर्षदिनी स्वतःच्या जगण्याला कोणती दिशा द्यायची, कोणता रस्ता पकडायचा हे स्वतःच ठरविले पाहिजे. त्यासाठी स्वतःशी संवाद साधा. प्रत्येक उगवणाऱ्या दिवसाला आजचा दिवस माझा आहे, असे समजून कामाला लागा. काम करताना जगण्याचा हेतू समजून घ्या. चार-पाच वर्षापूर्वी संदीप वासलेकर सरांचा नववर्षाचा सकाळमधील लेख मनात घर करून आहे. युवकांना नव्या वर्षाच्या शुभेच्छा देताना ते म्हणाले होते, कोट्यधीश हो! अब्जाधीश हो!' जे सामाजिक कार्यकर्ते, उद्योजक, विचारवंत, लेखक हे जेवढ्या लोकांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणतात, जेवढ्या लोकांच्या आयुष्यावर ते सकारात्मक परिणाम घडवून आणतात, तेवढ्या प्रमाणात ते लक्षाधीश, कोट्यधीश, अब्जाधीश होतात. नारायण मूर्ती यांनी दोन लाख लोकांना नोकरी दिली म्हणजे पाच लाख लोकांचे भले केले. भ्रष्टाचारविरोधी चळवळ सुरू करून भारतातील एक अब्ज लोकांच्या मनास स्पर्श केला म्हणून अण्णा हजारे अब्जाधीश, नारायण मूर्ती लक्षाधीश. एकेकाळी भारतात स्वामी विवेकानंद, महर्षी कर्वे, महात्मा गांधी असे अनेक कोट्यधीश होऊन गेले. येथे सत्तेसाठी लोकांची मन जिंकणारे किंवा करमणुकीतून लोकांचे मन जिंकणारे खेळाडू, नट ते यात येत नाहीत; परंतु जे लोकांच्या जीवनात फार मोठा बदल घडवून आणतात ते लक्षाधीश, अब्जाधीश होत. जागतिक नेते बिल गेट्स, सर्जी ब्रिन व मार्क झुकरबर्ग यांनी संगणक, गुगल, फेसबुक आणून अब्जावधी लोकांच्या जीवशैलीवर परिणाम केला. ते अब्जाधीश होत. आज कोट्यधीशांची कमतरता आहे. तेव्हा युवकांनो! नव्या वर्षाच्या शुभेच्छा, कोट्यधीश हो, अब्जाधीश हो!' युवकांनो! भोवताली काय घडतंय हे जाणून घ्या. तुम्हाला संधी आहे. सर्वांना समर्पित असणारे काम करा. लक्षात ठेवा, आपले काम हा आपल्या आयुष्याचा सर्वात महत्त्वाचा भाग असतो. महान इटालियन चित्रकार, शिल्पकार मायकेल अँजेलोच्या खात्यावर अनेक सर्वोत्तम शिल्पे व चित्रे नोंदवलेली आहेत. या यादीत सर्वात वरचे नाव डेव्हिडचा पुतळा आणि पिएटा शिल्प होय. डेव्हिड हे केवळ शक्तीचे प्रतीक न राहता फ्लॉरेन्समधील नागरिकांचे प्रतीक बनले आहे. मायकेल एन्जेलोच्या जन्माआधीपासून एक प्रचंड ठोकळावजा संगमरवरी तुकडा एका चर्चच्या आवारात अनेक वर्षे पडून होता. बऱ्याच महान कलावंतांनी तो दगड दोषपूर्ण व निकामी ठरविला होता. मायकेल शिल्पाकृतीवर काम करीत असताना एका मुलाने विचारले, तो असा दगडावर हातोडा का आपटत बसला आहे? मायकेल म्हणाला, तरुण मुला, यात एक देवदूत राहतो त्याला मी मुक्त करीत आहे. बारीकसारीक सूक्ष्म तरल बारकावे दाखविण्यासाठी मायकेलचा बराच वेळ जात होता. एका माणसाला वेळेचा अपव्यय वाटून, न राहून त्याने मायकेलला विचारले, तू असं का करतोस? मायकेल म्हणाला, किरकोळ अशा वाटणाऱ्या गोष्टींतूनच परिपूर्णता येते आणि परिपूर्णता ही किरकोळ बाब नव्हे.' मायकेल एंजोलोने एका मृत ठोकळ्याला जिवंत करण्याची किमया साधली आणि अजरामर डेव्हिड शिल्प उभे केले. बरेचजण काम करताना फक्त पाट्या टाकतात. तुम्ही काम करताना तुमच्या कामाचा अन्वयार्थ कसा लावता? निव्वळ दगडफोड्या की स्वतःला सर्वोत्तम कॅथेड्रलचे शिल्पकार? चांगल्याप्रकारे केलेले काम हाच उद्याचा भरवसा असतो. चांगल्या कामाची कदर सावकाशीनेच मिळते. युवकांनो, स्वतःलाच संधी द्या. लक्षात ठेवा, तुम्ही स्वतः टाकाऊ दगडाचा तुकडा नाही. उचला छिन्नी-हातोडा आणि स्वतःमधील अनावश्यक दगड काढून टाका. चांगल्या कामासाठी खरे पाहता नववर्षाचीही आवश्यकता नसते. तरी नववर्षाच्या सर्वांना शुभेच्छा. पुढचे पान उलटा, दगडाला आकार देण्याची नवीन पद्धत सापडेल. वर्तमानात जगत नववर्षाचे स्वागत करताना, स्वतःमधील विजेत्याला निर्माण करा. हॅप्पी न्यू इयर म्हणत सामाजिक जबाबदारीचे भानही जपले पाहिजेत.

# वोटर आयडी आधार लिंकची भानगड?

**केंद्र सरकारचं निवडणूक सुधारणा विधेयक २०२१ लोकसभा आणि राज्यसभेत पास झालं. विधेयक पास होत असताना दोन्ही सभागृहांमधे विरोधकांनी चर्चेची मागणी केली. पण या मागणीकडे सरकारने दुर्लक्ष केलं. वोटर आयडी-आधार लिंकच्या मुद्यानं वातावरण तापवलं. निवडणूक सुधारणांच्या दृष्टीने हे महत्वाचं पाऊल असल्याचं सरकारने म्हटलंय. तर मतदाराच्या खाजगीपणावरचा हल्ला असल्याचं म्हणत विधेयकाला विरोधही होतोय.**

संसद किंवा राज्यांची विधिमंडळं आज-काल गदारोळांसाठीच फार चर्चेत असतात. २० डिसेंबर संसदेसाठी असाच गदारोळाचा ठरला. केंद्र सरकारनं एक महत्वाचं विधेयक आणलं आणि विरोधी पक्षांनी चर्चेची मागणी लावून धरली. पण विरोधकांच्या मागणीला केराची टोपली दाखवत प्रचंड गदारोळात सरकारनं हे विधेयक लोकसभेत पास केलं. २१ डिसेंबरला राज्यसभेतही हे विधेयक सरकारने आवाजी मतदानाने पास करवून घेतलं. सरकारने विधेयक मंजूरीसाठी राष्ट्रपतींकडे पाठवलंही. 'निवडणूक सुधारणा विधेयक २०२१' असं या विधेयकाचं नाव आहे. त्यातल्या वोटर आयडी आधारशी लिंक करायच्या मुद्यामुळे सरकारवर टीका होतेय. पण केंद्र सरकारने हे विधेयक म्हणजे निवडणूक सुधारणांच्या दृष्टीने महत्वाचं पाऊल असल्याचं म्हटलंय. तर मतदाराच्या खाजगीपणावरचा हा हल्ला असल्याचं विरोधी पक्षांचं म्हणणं आहे.

विधेयकातल्या महत्वाच्या तरतुदी

वोटर आयडी बनवायचं तर आपल्याला निवडणूक अधिकारी किंवा त्याच्या समकक्ष अधिकाऱ्याकडे जावं लागायचं. आता ही प्रक्रिया ऑनलाईन करण्यात आल्यामुळे आवश्यक कागदपत्रं देऊन रजिस्ट्रेशन करता येणं शक्य आहे. नव्या 'निवडणूक सुधारणा विधेयक २०२१'मधे वोटर आयडी आणि आधार लिंक करण्यासाठी महत्वाची तरतूद करण्यात आलीय. अर्थात ही बंधनकारक नसल्याचं सरकारने म्हटलंय. बाहेरच्या देशांमधे सेवेत असलेल्या भारतीय कर्मचाऱ्यांच्या पत्नी या देशाच्या सर्वसामान्य नागरिक असल्याची तरतूद १९५०च्या कायद्यात करण्यात आली होती. या कर्मचाऱ्यांच्या पत्नीलाच मतदान केंद्र किंवा पोस्टाने मतदान करता यायचं. बाहेरच्या देशांमधल्या सैन्यातल्या कर्मचाऱ्याला मतदानाचा अधिकार नव्हता. नव्या तरतुदींमधे पत्नी हा शब्द काढून 'पती-पत्नी' असा करण्यात आलाय. त्यामुळे आता या कर्मचाऱ्यांनाही मतदानाचा अधिकार असेल. ईव्हीएम मशीन, मतदानापूर्वीचं वेगवेगळं साहित्य, सुरक्षा व्यवस्थेची जबाबदारी यासंदर्भात स्पष्ट अशी तरतूदही या विधेयकात करण्यात आलीय. मतदान काळातल्या अडचणी लक्षात घेऊन सोयी सुविधाही निश्चित करण्यात




आल्यात. याआधी मतदार यादीत आपलं नाव टाकायचं तर १ जानेवारीला रजिस्ट्रेशन करावं लागायचं. नव्या तरतुदीनुसार १ जानेवारी, १ एप्रिल, १ जुलै, १ ऑक्टोबर अशा तारखांना मतदार यादीत नाव टाकण्यासाठी रजिस्ट्रेशन करता येणं शक्य होईल.

विरोधकांच्या आक्षेपाचे मुद्दे

विधेयकातल्या काही तरतुदींना विरोधी पक्षांनी आक्षेप घेतला होता. विशेषतः वोटर आयडी-आधार लिंक करणं. त्यासाठी चर्चेची मागणीही करण्यात आली होती. हे विधेयक स्थायी समितीकडे पाठवावं असं विरोधकांचं म्हणणं होतं. पण सरकारने याकडे दुर्लक्ष केलं.

**आज-काल**

**अक्षय शारदा शरद**

उत्तरप्रदेशच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हे विधेयक आणल्याचा आरोप लोकसभेतले काँग्रेसचे गटनेते रंजन चौधरी यांनी केला होता. एमआयएमसारख्या पक्षांनीही हाच आरोप केला होता. प्रमुख विरोधी पक्षांसोबत पीपल युनियन ऑफ सिविल लिबर्टी, ॲमनेस्टी अशा अनेक संघटनांनी या विधेयकाला विरोध केलाय. काही महत्वाचे मुद्दे उपस्थित करत त्यांनी विधेयकातल्या तरतुदींवर आक्षेप घेतलाय. आधार कार्ड हे नागरिकत्व नाही तर ओळखपत्र आहे. मतदार यादीत एखाद्याचं नाव नव्याने जोडणं किंवा काढून टाकण्यासाठी आधार पुरावा नाही असं या संस्थाचं म्हणणं असल्याचं डीडब्ल्यू वेबसाईटवरच्या एका रिपोर्टमधे म्हटलंय. आज पॅन कार्ड, बँक खात्यात आधार लिंक करणं अनिवार्य करण्यात आलंय. त्यामुळे प्रत्येक गोष्ट आधारशी लिंक करणं हा कायदा बनू नये असं या संघटनांचं म्हणणं आहे. तसंच वोटर आयडीमधली माहिती थेट आधारशी लिंक करणं हा मतदारांच्या खाजगीपणाला धोका असल्याचंही या संस्थांना वाटतंय. या माहितीचा वापर कुणी कुठं, कुणाला मतदान केलं हे शोधण्यासाठी केला जाऊ शकतो अशी भीतीही त्यांनी व्यक्त केलीय. रेशन कार्ड आणि मनरेगासारख्या योजनांमधेही बँक खात्याला आधार लिंक करणं अनिवार्य करण्यात आलं होतं. त्याचा वापर चुकीच्या पद्धतीने करून गैरव्यवहार झाल्याच्या अनेक बातम्याही बाहेर आल्या होत्या. झारखंड राज्यात तर रेशन कार्ड आणि आधार लिंकच्या भानगडीत ८८ टक्के लोकांचे रेशनकार्ड रद्द झाल्याची बातमी आली होती.

आंध्रप्रदेश, तेलंगणाचा धडा

केंद्रीय निवडणूक आयोगाने २०१५पासून वोटर आयडी-आधार लिंकची मागणी लावून धरली होती. माजी कायदा मंत्री रविशंकर प्रसाद यांनी लोकसभेतल्या एका उत्तरात या संबंधी सरकार विचार करत असल्याचं म्हटलं होतं. वोटर आयडी आणि आधार लिंकसाठी निवडणूक आयोगाने 'राष्ट्रीय निवडणूक कायदा शुद्धीकरण आणि प्रमाणीकरण' कार्यक्रमही जाहीर केला होता. पण सर्वोच्च न्यायालयाने त्यावर आक्षेप घेतला. त्यामुळे निवडणूक आयोगाने हे ऐच्छिक असेल असं जाहीर करावं लागलं होतं. हाच कार्यक्रम २०१५ला आंध्रप्रदेश आणि तेलंगणाने आपल्या राज्यांमधे राबवला. वोटर आयडी आधारला लिंक करण्याची योजना आखली गेली. २०१८ला आंध्रप्रदेश आणि तेलंगणातली एक मतदार यादी जाहीर झाली. त्यातून या राज्यांमधल्या लाखो मतदारांची नावं मतदार याद्यांमधून काढून टाकल्याचं समोर आलं. त्यामुळे काही महिन्यातच सर्वोच्च न्यायालयाने या प्रक्रियेवर 'स्टे' आणला. तेलंगणा राज्यातले ३० लाख आणि आंध्रप्रदेशमधल्या २१ लाख मतदारांची नावं मतदार याद्यांतून गायब झाली होती. त्यावरून तेलंगणाच्या विधानसभेत प्रचंड गदारोळही झाला. वोटर आयडी-आधार लिंक करताना काही तांत्रिक अडचणींमुळे हे झाल्याचं या राज्यांमधल्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी मान्य केलं. त्यासाठी त्यांना माफी मागावी लागली होती.

मतदानाच्या अधिकारावर गंडांतर?

केंद्रीय कायदा मंत्री किरण रिजिजू यांनी निवडणूक सुधारणांच्या दृष्टीने हे महत्वाचं पाऊल असल्याचं लोकसभेत हे विधेयक सादर करताना म्हटलंय. एकापेक्षा अधिक नाव नोंदणी आणि बोगस मतदान रोखणं सरकारचा यामागचा उद्देश आहे. पण लोकसभेत विधेयक पास करताना त्यावर कोणतीही चर्चा व्हावी असं सरकारला वाटलं नाही. यात मूळ मुद्दा खाजगीपणाच्या अधिकाराचा आहे. या मुद्यावरून वेगवेगळ्या संस्थानी वेळोवेळी आवाज उठवलाय. त्याची दखल सर्वोच्च न्यायालयालाही घ्यावी लागलीय. त्याचाच भाग म्हणून आधारचा केवळ सरकारी सबसिडी, योजना यांच्यासाठी वापर करता येईल असं २०१८ला सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला होता. वोटर आयडी आणि आधार लिंक करणं ऐच्छिक असल्याचं केंद्र सरकारचं म्हणणं आहे. असं असलं तरी नव्या संशोधन विधेयकाच्या तरतुदीप्रमाणे निवडणूक अधिकारी तुमच्याकडे आधार कार्डची मागणी करू शकतो. त्याला तुम्ही नकार देऊ शकत नाही. त्यामुळे यात काही गडबड झालीच तर आपल्या मतदानाच्या अधिकारावरही गंडांतर येऊ शकतं. त्यामुळे याविरोधात स्वयंसेवी संस्था न्यायालयात जायची तयारी करतायत.

# हरवलेल्या विवेकाची वास्तववादी गोष्ट

**२०२१ला बाय-बाय करण्याची वेळ आलीय. वर्षभरात अनेक घडामोडी घडल्यात. कोरोना वायरस होताच पण त्याच सोबतीनं बेरोजगारीचे आकडेही डोळे पांढरे करणारे होते. पेट्रोल-डिझेलसोबत महागाईही वाढत होती. सर्वसामान्य लोकांना मात्र याचा विसर पडला. भारतात नव्या कॅटेगरींचा झालेला उदय यामागचं खरं कारण होतं. त्याबद्दल सांगतायत ज्येष्ठ पत्रकार रवीश कुमार. त्यांच्या एनडीटीवीवरच्या प्राईम टाईमचं हे शब्दांकन.**

लाभार्थी

भारतात नव्या लोकांचा उदय झालाय. 'लाभार्थी' असं त्यांचं नाव आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या सभांमधल्या रिकाम्या खुर्च्या भरण्यासाठी या लाभार्थ्यांचा जन्म झालाय. इथं एक किलो डाळ, एक लिटर तेल, एक सिलेंडर मिळालेली व्यक्ती जशी लाभार्थी आहे आणि ज्याला काहीच मिळालं नाही अशा व्यक्तीचंही इथं स्वागत आहे. लाभार्थी स्वतःहून येत नाही. त्याला सरकारी कर्मचारी घराघरातून बोलावून घेऊन जातात. सगळ्यात मोठ्या सरकारचं भाषण ऐकणं हा त्यामागचा उद्देश. लाभार्थी सरकारचा विद्यार्थी आहे. ज्याला पंतप्रधानांच्या प्रत्येक सभेला आपल्या शाळेचा वर्ग समजून हजर रहावं लागतंय. टॅक्समधे लाखो, करोडोंची सूट मिळणाऱ्यांमधे मात्र हा लाभार्थी येत नाही. एक लिटर तेलाचे लाभार्थी या सभांमधे बोलावले जातात आणि एक लाख कोटींचे लाभार्थी मालदीवमधे ख्रिसमसच्या सुट्ट्यांचा आनंद घेतायत. त्यांनाही लाभार्थी म्हणून या सभांमधे बोलवायला हवं. गरीब लाभार्थ्याला हे कळायला हवं की तो श्रीमंत होईल तेव्हा त्यालाही एक लाख कोटींचा फायदा मिळेल. सध्यातरी या गरीब लाभार्थ्यांनी एक लिटर तेल हेच आपलं नशीब समजावं. आकाशात लढाऊ विमान उडताना हे लाभार्थी बघत असतील तेव्हा तेही प्रबळ आणि ताकदवान भारताच्या कल्पनांमधे हरवून जात असतील.

बाजार्थी

लाभार्थ्यांसोबतच बाजार्थी अशा नव्या कॅटेगरीचा उदय झालाय. त्यांचं नामकरण याआधी कधीच झालं नव्हतं. बाजार्थी हा एकप्रकारचा वैचारिक लाभार्थीच आहे. याआधी हा लाभार्थी लपलेला होता. वर्षभरापूर्वी तो त्यांच्या त्यांच्या बाल्कनींमधे दिसला. त्यांच्या सारखाच कुणी लाभार्थी समोरच्या बाल्कनींमधे राहतोय ही बातमी देण्यासाठी हा लाभार्थी समोरासमोर आला असावा. पण त्यांची पूर्णपणे ओळख झाली नाही. त्यामुळे त्यांना पुन्हा एकदा आपापल्या बाल्कनीत दिवा घेऊन उभं रहायचा टास्क दिला गेला.

वादार्थी

जानेवारी २०२२मधे काशीत शंखवादनाचं रेकॉर्ड बनवलं जाईल. त्यासाठी उत्तरप्रदेश सरकारने १००१ शंखवादकांसाठी जाहिरात काढलीय. त्यांना १ हजार रुपये आणि एक सर्टिफिकेट दिलं जाईल. १० लाख रुपये खर्च करून हे वर्ल्ड रेकॉर्ड केलं जाईल.

सरकारी कार्यक्रमही 'सास भी कभी बहू थी'ला मागे टाकत खूप पुढं निघून गेलेत. मोदींच्या काशी विश्वनाथ भेटीत डमरू वादक उभे करण्यात आले. त्यामुळे लाभार्थी, बाजार्थी असा प्रवास करत आता आपण वादार्थीपर्यंत येऊन पोचलो आहोत.

संध्याकाळची वेळ असते. पंतप्रधान नरेंद्र मोदी कोरोनाच्या तिसऱ्या लाटेचा आढावा घेण्यासाठी एक बैठक घेतात. आता पंतप्रधानांनी बैठक बोलावलीय म्हणजे सगळे अधिकारी हजर हवेतच! बैठकी दरम्यान पंतप्रधानांचा चेहरा फार गंभीर होतो. कोरोनाच्या वाढत्या केसेसमुळे 'वॉर रूम'च्या तयार ठेवायच्या सूचना दिल्या जातात. त्यात रात्रीच्या वेळी कर्फ्यू लावायचे आदेशही दिले जातायत. संध्याकाळी उशिरा चाललेल्या या बैठकीमुळे कोरोनाच्या तिसऱ्या लाटेसंदर्भात सरकार किती गंभीर आहे असं तुम्हाला वाटेल. पण याच दिवशी दुपारी आणि त्याच्या आदल्या दिवशी पंतप्रधान वाराणसीमधे सभा घेत होते. कदाचित कोरोनानं ट्विट केलं असेल की, 'सॉरी बॉस, इंडियामें दिनमें नहीं आ सकूँगा और बनारसके रॅलीमें जानेका बिलकुल इरादाही नहीं। मै रातमें थोडा घूमना चाहता हूं तो प्लिज आप कर्फ्यु लगा दे ताकी मैं अकेला घूम सकूँ।' लोकांमधे थोडी तरी 'ती' गोष्ट असती तर लोकांनी विचारलं असतं की, लग्नात २००पेक्षा अधिक लोक येऊ शकत




नाहीत आणि रॅलीत लोकांना घराघरातून बोलावलं जातंय. कोरोना बहुतेक लग्नातल्या वऱ्हाडी मंडळींसारखा आहे. तो चांगलं चुंगलं खायच्या इराद्याने फक्त लग्नांमधे भटकतोय आणि या भरगच्च सभांना दांडी मारतोय!

आपल्याकडे 'ती' गोष्ट नसल्यामुळेच केंद्र सरकार आणि उत्तरप्रदेश सरकारने कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत ऑक्सिजनअभावी कुणाचाही मृत्यू झाला नसल्याचं म्हटलं. त्यानंतर काहीच

**विशेष**

**रवीश कुमार**

दिवसांमधे देशाची राजधानी दिल्लीला बंद करावं लागलं. त्याचं कारण हवेत ऑक्सिजन नव्हतं तर फक्त कार्बन मोनॉक्साईड होतं. रेल्वे मंत्री नितीन पियुष गोयल यांनी एक ट्विट केलं होतं. त्यात एका मालगाडीवर कंटेनर दिसतायत. ज्याला ऑक्सिजन एक्सप्रेस असं नाव दिलं गेलंय. जर ऑक्सिजनची कमतरता नव्हती तर अशा एक्सप्रेसची गरज का पडली? असे मथळे येऊ लागले. दुसऱ्या देशांमधून ऑक्सिजन आणण्यासाठी कंटेनर पाठवले गेले. वायू सेनेच्या विमानातून हे कंटेनर उतरवले जात होते. ऑक्सिजन पोचवण्याचे आदेश सरकार देत होतं. नाक्या नाक्यांवरून ऑक्सिजनच्या गाड्या पुढे सोडल्या जात होत्या. रस्त्यांवरच लोकांना ऑक्सिजनच्या नळकांड्या नाकात घालाव्या लागत होत्या. एप्रिल-मेमधे लोकांचे ऑक्सिजनअभावी मृत्यू झाले. हे चित्र समोर असताना सरकार मात्र प्रत्येकवेळी ऑक्सिजनची कमतरता नसल्याचं म्हणत होतं. दुसरीकडे ऑक्सिजन प्लांटची उद्घाटनं होत होती. ऑक्सिजनची कमतरता नव्हती मग प्लांटची गरज का पडली? ऑक्टोबरमधे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तराखंडमधे ३५ ऑक्सिजन प्लांटचं उद्घाटन केलं. जर प्लांट नव्हते तर ऑक्सिजन कसं असेल? लखीमपूरमधून मंत्री अजय मिश्रा टेनी एका ऑक्सिजन प्लांटचं उद्घाटन करून जात असताना त्यांना असाच प्रश्न पत्रकाराने विचारला. त्यावर त्यांनी त्या पत्रकाराला धमकी देत धक्काबुक्की केली. ऑक्सिजनची कमतरता नव्हती तर कंटेनर सौदी अरेबियातून मागवायची गरज का पडली? हॉस्पिटलमधे ऑक्सिजनअभावी तडफडत झालेले मृत्यू आपण विसरलो. 'अगदी काहीच तासांचा ऑक्सिजन पुरवठा शिल्लक आहे. तो संपला तर लोकांचे जीव जातील.' असं रडत रडत सांगणाऱ्या जयपूरच्या डॉ.डी.के.बलुजा सारख्या डॉक्टरांना आपण विसरलो.

ऑक्सिजन हे यावर्षीचं सगळ्यात मोठं सत्य. हे सत्य असत्य बनून समोर आलंय. २०२०ला ऑक्सिजनचं संकट आलं. टेंडर काढले गेले. ऑक्सिजन सप्लायचं काम पंतप्रधान कार्यालयाच्या एका उच्चस्तरीय समितीच्या देखरेखीखाली चालू होतं. पण ही समिती कधीच समोर आली नाही. संसदीय समिती ऑक्सिजनचा सप्लाय नीट करायचा इशारा देत होती. त्याचवेळी दुसऱ्या लाटेत लोकांचा ऑक्सिजनअभावी मृत्यू होत होता. २३ एप्रिल २०२१ला इंडियन एक्सप्रेसमधे हरकिशन शर्मा यांचा एक लेख आला होता. एप्रिल २०२०मधे पुढच्या काळात भारताला ऑक्सिजनची कमतरता जाणवेल असा इशारा देण्यात आला होता. पण त्यावर पुढे काहीच झालं नाही. २५ नोव्हेंबरला रामगोपाल यादव यांच्या अध्यक्षतेखालच्या स्थायी समितीने एक रिपोर्ट लोकसभा, राज्यसभेसमोर ठेवला. ऑक्सिजनची सप्लाय व्यवस्था ठीक करण्याची गरज असल्याचं म्हटलं होतं. त्यांनी वेंटिलेटर, बेडबद्दलच्या कमतरतेकडे लक्ष वेधलं. सरकारने प्रत्येक गोष्टीकडे दुर्लक्ष केलं. ऑक्सिजनअभावी कुणी मेलंच नाही असं सरकारने जाहीरच केलं होतं. लोक मेलेच असतील तर २०२०मधे लोकांनी थाळ्या वाजवल्यामुळे किंवा मग फुलं उधळून तरी!

आग्रामधे नौबरी नावाचं एक गाव आहे. ऑक्सिजनच्या कमतरतेमुळे इथले लोक थेट पिंपळाच्या झाडाखाली बसू लागले. ऑक्सिजनचा सप्लाय थेट इथून होतोय हे त्यांचं झाडाखाली बसण्यामागचं लॉजिक होतं. यातल्या एका माणसाने थेट घरातला पलंग झाडावर चढवला. तिथं सेट करून तो त्यावर बसला. जास्त जवळून आपल्याला ऑक्सिजन घेता येईल असा त्याचा समज असावा. जी' गोष्ट पूर्ण भारतातच नव्हती, ती' या लोकांकडेतरी कुठून येणार? व' पासून


आधुनिक विचारांचे वर्तमान

छत्रपतींच्या विचारांची नवी पिढी घडवा

एसटी कर्मचारी संपाची तलवार म्यान

कनिष्ठ वेतन श्रेणी एसटी कामगार संघटनेची घोषणा

'इंडियन स्पाईसी' लोकिकास पात्र ठरेल : आठवले

सायरस पुनावाला यांना भारतरत्न किताब द्या

# मायबाप वाचकहो..!

'गाव तिथं वर्तमान' मोहिमे अंतर्गत आमच्या वाचकांना नवं, आकर्षक पॅकेज देण्याचा आमचा मानस आहे. त्यादृष्टीने वर्षभर घरपोच अंक मिळविण्यासाठी केवळ ४९९₹ भरा. अंकासोबतच तुमच्या कुटुंबातील लाडक्या व्यक्तीचा वाढदिवस अधिक द्विगुणीत करण्यासाठी ठराविक आकारातील जाहिरात अगदी मोफत प्रसिद्ध केली जाईल. त्यासाठी वर्तमान तर्फे मोफत जाहीरात कूपन देण्यात येणार आहे. तरी आपण कसलीच संधी न दवडता आमच्या 'गाव तिथं वर्तमान' मोहिमेत सहभागी होण्यासाठी संपर्क साधावा.




## संधी दवडू नका,

## सहभागी व्हा!

आधुनिक विचारांचे

**वर्तमान**

आपले वृत्तपत्र, आपला आवाज

कॉर्पोरेट ऑफीस : 'शिवगड' २३, मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव जि.बीड (महाराष्ट्र) ४३११३१

vartmaneditor@gmail.com 9423209823

www.vartmannews.in 7499934141

आधुनिक विचारांचे वर्तमान

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि **संपादक : भगीरथ गौरीशंकर तोडकरी,** यांनी तुळजा भवानी पब्लिकेशन ,माजलगाव ता.माजलगाव जि. बीड 431131 (महाराष्ट्र) येथे छापून आधुनिक विचारांचे वर्तमान कार्यालय, 23,मुख्य रस्ता, मस्जिद चौक, माजलगाव ता.माजलगाव जि.बीड येथे प्रसिद्ध केले. ईमेल : vartmaneditor@gmail.com भ्रमणध्वनी : **9423209823** RNI : MAHMAR/2018/76928, अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, लेख, व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद माजलगाव न्यायालय अंतर्गत) Postal REG No : L/92/RNP/Beed/2020-2022.